# प्रकरण - सहावे

## उपसंहार

देशाचा, राज्यांचा, राजघराण्यांचा इतिहास जसा लिहिला जातो, तसा राजपुरूषांचा, कर्तबगार व्यक्तींचा आणि कर्तबगार घराण्यांचाही इतिहास लिहिला जातो. मराठा इतिहासलेखनामध्ये काही मोजक्या सरदारांना त्यांच्या कामगिरीमुळे प्रसिध्दी मिळाली. परंतु काही सरदारांनी दैदिप्यमान कामगिरी केली, स्वराज्य रक्षणाची जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडली तरीही त्यांच्या कार्यावर म्हणावा तसा प्रकाश पडलेला नाही. काहीं सरदार दुर्लक्षित राहिले परिणामी प्रसिध्दीच्या झोतात आले नाहीत, अशा सरदारांना इतिहासलेखनाच्या मुख्य प्रवाहात आणले गेले पाहिजे. यामध्ये सातारा जिल्हयातील, पाटण खोऱ्यातील साळुंखे ऊर्फ पाटणकर या घराण्याचा इतिहास आजवर उपेक्षित, दुर्लक्षित राहिलेला आहे.

प्राचीन चालुक्यवंशीय, सोळांखी ऊर्फ साळुंखे ऊर्फ पाटणकर घराणे हे दक्षिणेकडील अस्सल राजवंशीय घराणे आहे. या घराण्यातील काही घराणी गुजरात व महाराष्ट्रात आली व दक्षिणेतच राहू लागली. प्रसिध्द बहामनी राजवटीत दक्षिणेतील अनेक क्षत्रिय कुळांनी बादशहाच्या पदरी क्षत्रिय धर्माचे सेवाकार्य स्वीकारले. नागोजीराव साळुंखे यांना दिल्लीच्या बादशहाचा पक्ष घेणाऱ्या लोकांचा आणि इतर लहानमोठ्या बंडवाल्यांचा मोठ्या शर्तीने बिमोड केल्याबद्दल बहामनी सुलतानाने दंतागिरी व गुणवंतगडाची देशमुखी इ.स.१५१० मध्ये दिली होती. तेव्हापासून नागोजीराव साळुंखे या दोन्ही गडाची देशमुखी सांभाळू लागले होते.

बहामनी राज्याची शकले झाल्यानंतर जोत्याजीराव साळुंखे व त्यांचे वंशज विजापूरच्या सुलतानाची सेवा बजावताना आपणांस

दिसून येतात. पुढे वारणेच्या पलीकडे काही डोंगरी मुलूखात रामोशी वगैरे लोक सरकारी सारा न देता नेहमी दरोडे घालून लोकांना त्रास देत असत. तेव्हा ज्योत्याजीराव साळुंखे यांनी विनंती केली की, 'मी तिकडे जाऊन बंदोबस्त करितो'. तेव्हा विजापूरच्या सुलतानाने खुश होऊन जोत्याजीराव साळुंखे यांना पाटण महालांतील साठ गांवची देशमुखी वतनाची सनद जोत्याजीराव साळुंखे यांस देऊन त्यांना तिकडील मुलूखाचा बंदोबस्त करण्याकरितां पाठविले. या नव्या वतनामुळे त्यांना व त्यांचे पुढील वंशजांस 'पाटणकर' असे म्हणू लागले व त्याच उपनावाने आजही ते ओळखले जातात.

१७ व्या शतकाच्या सुरूवातीला अनेक मराठा घराण्यांचा उदय झाला. त्यामध्ये 'भोसले' घराणे हे प्रमुख होते. या घराण्यातील छत्रपती शिवाजी महाराजांनी अनेक मराठा सरदारांना एकत्र करून मराठा स्वराज्याची निर्मिती केली. परंतु हा प्रयत्न पहिल्यांदा नव्हता, तर शहाजी राजे यांनी इ.स. १६३२च्या सुमारास स्वतंत्र राज्य स्थापन करण्याचा प्रयत्न केला होता. या प्रयत्नाच्या अपयशामुळे समस्त मराठी समाज एकत्र येणे गरजेचे आहे, याची जाणीव समाजातील सुज्ञ लोकांना झाली. या काळात अनेक शूरवीर रणांगणात आणि राजकारणात तरबेज बनले त्यात सरदार पाटणकर घराण्यातील पुरूषही होते. आपले एक बलिष्ठ राज्य आपण इतर कुणाची ही मदत न घेता उभारता येऊ शकते, हा विश्वास शहाजीराजांनी मराठयांच्यात निर्माण केला.

शिवछत्रपतींची स्वराज्य निर्मिती मागील भूमिका ज्यांनी स्वीकारली, त्यांनी शिवछत्रपतींना मनोमन साथ दिली. अशी साथ देणारी जी काही मोजकी घराणी महाराष्ट्रात होती, त्यापैकी एक कोयना—केरा खोऱ्यातील साळुंखे ऊर्फ पाटणकर घराणे होय. इ.स. १६५९साली झालेल्या अफझलखान वधानंतर शिवाजी महाराजांनी वाई—प्रतापगडापासून कोल्हापूर—पन्हाळयापर्यंतचा प्रदेश स्वराज्यात सामील करून घेतला, त्यावेळी

खऱ्या अर्थाने कोयना आणि केरा खोरे व तेथील वतनदार पाटणकर देशमुख स्वराज्यात रूजू झाले, तथापि, आपणांस या काळातील सरदार पाटणकर घराण्यासंदर्भातील कागदपत्रे मिळत नाहीत. शिवाजी महाराजांनी सरदार पाटणकर यांना लिहिलेले इ.स. १६७८चे एकमेव पत्र उपलब्ध आहे.

छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराजांच्या कारकिर्दीतील सरदार पाटणकर घराण्याची अस्सल कागदपत्रे उपलब्ध नाहीत. परंतु छत्रपती राजाराम महाराज आणि महाराणी ताराबाईसाहेब यांच्या काळातील बरीच कागदपत्रे आपणांस पहावयास मिळतात. यावरून या घराण्याने 'मराठयांच्या स्वातंत्र्ययुध्दात' केलेली कामगिरी आपणास पहावयास मिळते. छत्रपती संभाजी महाराजांच्या निघृण हत्येनंतर स्वराज्यातील अनेक वतनदार लोक मोगलांच्या भीतीने, त्यांच्या सेवेत रूजू झाले होते. पण सरदार पाटणकर घराणे हे मात्र स्वराज्याच्याच सेवेत राहून छत्रपतींशी एकनिष्ठ राहिले होते. पाटणपासून जावळीपर्यंतच्या प्रदेशातील वतनदार लोक शत्रूस सामील झाले होते, त्यांच्यावर स्वाऱ्या करून त्यांनी त्यांना शिक्षा केल्या आणि त्या प्रदेशात छत्रपतींच्या वतीने स्वराज्याचा अंमल पुन्हा प्रस्थापित केला होता.

इ.स. १६८९ ते इ.स. १६९६ हा काळ सरदार पाटणकर घराण्याच्या दृष्टीने उत्कर्षाचा व प्रगतीचा सुवर्णकाळ होता. छत्रपतींकडे सरदार पाटणकरांनी वेळोवेळी इनामे, वतने देण्याची मागणी केलेली दिसून येते. तसेच छत्रपतींनी सरदार पाटणकरांची मागणी मान्य केलेली दिसून येते. हे जरी स्वार्थाचे, लोभाचे वाटत असले तरी सैन्य हे पोटावर चालते. सैन्याचा उदरनिर्वाह, जवळ असलेल्या प्राण्यांना दाणापाणी त्यामुळे सरदार पाटणकरांनी छत्रपतींकडे केलेल्या मागण्या अयोग्य वाटत नाही. काही प्रसंगी छत्रपती राजाराम महाराजांकडून सरदार पाटणकरांनी आपणांस हव्या तशा सनदा मिळविल्या होत्या. परंतु तत्कालिन परिस्थितीत अशा मागण्या, सनदा मिळविणे हे प्रतिष्ठितपणाचे लक्षण होते.

शाहू महाराजांच्या सुटकेनंतर राजश्री रामराव पाटणकर हे शाहू महाराज यांची एकनिष्ठपणे सेवा करीत असलेले आपणास दिसून येतात. राजश्री धनाजी जाधव यांनी महाराणी ताराबाईच्या विरोधात जाऊन शाहू महाराज, सरदार चांदजीराव पाटणकर यांच्याबरोबर चंदन व वंदन हे किल्ले हस्तगत केले व सातारा किल्ला घेऊन शाहू महाराजांनी राज्यपद मिळविले. यावरून असे दिसते की, शाहू महाराजांच्या कारकिर्दीत सरदार पाटणकर घराण्यांने सेवा केलेली दिसून येते. शाहू महाराजांची बाजू किती न्यायाची व हक्काची आहे, हे जाणून सरदार पाटणकर घराण्याने शाहू महाराजांची बाजू घेतलेली दिसते. छत्रपती शाहू महाराजांनी रामराव पाटणकरांना राजगड किल्ला सर केल्याबद्दल करवीर इलाख्यापैकी भुदरगड पेटयातील काही गावांचे सरदेशमुखीचे वतन दिलेले दिसून येते.

शिवकाळात सरदार पाटणकर घराण्याने वेळोवेळी आपल्या शौर्याच्या जोरावर अनेक मानसन्मान, जहागिऱ्या, सनदा मिळविल्या. छत्रपतीकडून मिळणाऱ्या कौतुकाच्या थापेमुळे या घराण्याचे क्षात्रधर्म तेजोमय होत गेलेले दिसून येते. वेळोवेळी छत्रपतींनी दाखविलेला विश्वास त्यांनी आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर सार्थ केलेला दिसून येतो. शिवशाहीत, विशेषत: मराठयांच्या स्वातंत्र्ययुध्दाच्या कालखंडात सरदार पाटणकर घराण्याने केलेल्या अतुलनीय कामगिरीची माहिती आपणांस मिळते. स्वराज्य उभारणीमध्ये यशवंतराव, नागोजीराव, चांदजीराव, रामराव आणि पदाजीराव अशा सरदार पाटणकर घराण्यांतील पराक्रमी पुरूषांचे योगदान आपणांस पहावयास मिळते.

पेशवाई कालखंडामध्ये जी काही कागदपत्रे उपलब्ध आहेत, त्यावरून असे दिसते की, पेशवाईच्या अस्तापर्यंत मराठी राज्याची लष्करी व राजकीय सेवा या सरदार पाटणकर घराण्यांने केली आहे. तत्कालिन कागदपत्रांमध्ये रामराव, द्वारकोजीराव, नागोजीराव, राजसबाई, पिराजी, भागुजी, हिरोजीराव, सटवोजीराव, नाथाजीराव, जानराव, आप्पाजीराव, रमाबाई,

जिजाबाई, नारायणराव, मानसिंगराव इत्यादी सरदार पाटणकर घराण्यांतील व्यक्तींचा उल्लेख आढळतो.

बाळाजी विश्वनाथ, पहिले बाजीराव पेशवे यांच्या काळात सरदार पाटणकर घराण्यातील द्वारकोजीराव व त्यांचे चिंरजीव पेशव्यांच्या सेवेत असल्याचा व चिमाजी आप्पांच्या सिद्दी सातवरील स्वारीत त्यांच्या फौजेत असल्याचा उल्लेख एका पत्रातून मिळून येतो. नानासाहेब पेशवे यांच्या कारकिर्दीत सरदार पाटणकर घराणे पेशव्यांच्या आरमारात कार्यरत असल्याचे दिसून येते. तसेच कर्नाटकातील मोहिमांमध्ये सरदार नाथाजीराव पाटणकर हे मल्हारराव रास्ते यांच्या फौजेत सेवा बजावित होते. सरदार जानराव पाटणकर हे उदगीरच्या लढाईत प्रत्यक्ष युध्दभूमीवर हजर असलेले तत्कालिन पत्रावरून आपणांस पहावयास मिळते. तसेच सरदार जानराव पाटणकर यांनी पानिपत आणि राक्षसभुवन या लढायांत सहभाग घेऊन पराक्रम गाजविल्याचे आपणांस दिसून येते.

नारायणराव पेशवे यांच्या वधानंतर निर्माण झालेल्या बारभाईच्या कारस्थानात सरदार जानराव पाटणकर यांनी सवाई माधवरावांचा पक्ष स्वीकारून रघुनाथराव पेशव्यांच्या विरोधातील लढयात मोठे शौर्य गाजविलेले दिसून येते. या संदर्भात पेशव्यांच्या नावे त्यांच्या कारभाऱ्यांनी सरदार जानराव पाटणकर यांना पाठविलेल्या पत्रात मोठा गौरव केलेला आढळून येतो. कर्नाटकात टिपु सुलतानाविरूध्दच्या मराठयांच्या मोहिमांत सरदार जानराव पाटणकर यांनी सहभाग घेतलेला दिसून येतो. इंग्रज—मराठा पहिल्या युध्दात मराठयांचा विजय झाला. मुंबईहून पुण्याकडे खंडाळामार्गे येणाऱ्या इंग्रजांच्या फौजेतील एका तुकडीवर सरदार आप्पाजीराव पाटणकर यांनी जोरदार हल्ला केला व इंग्रजांना मिळणारी रसद तोडली, यामुळे वेळेवर मदत न पोहचल्यामुळे इंग्रजांना पराभव स्वीकारावा लागलेला आपणांस पहावयास मिळतो.

१८व्या शतकाच्या उत्तरार्धात बाबुराव साळुंखे ऊर्फ पाटणकर व आनंदराव धुळप यांच्या आरमाराचा वचक युरोपियन जहाजांवर होता. आपल्या जलद आरमारी हालचालीद्वारे इंग्रजांना धडकी भरविलेली दिसून येते. सवाई माधवराव यांच्या कारकिर्दीत बाबुराव साळुंखे ऊर्फ पाटणकर यांच्या आरमाराने पोर्तुगीजांवर आक्रमण केले होते. तेव्हा पोर्तुगीजांनी मराठयांसमोर टिकाव लागणार नाही, हे ओळखून पेशव्यांशी तह केला होता, हे आपणांस तत्कालिन कागदपत्रावरून दिसून येते. दुसरे बाजीराव पेशवे यांच्या काळात त्रिंबक डेंगळे हा जेव्हा इंग्रजांच्या कैदेतून निसटला होता, तेव्हा त्याला पकडून देण्याची जबाबदारी इंग्रजांनी दुसऱ्या बाजीरावावर सोपविली होती. त्या संदर्भात पेशव्यांनी सरदार नागोजीराव पाटणकरांना पाठविलेले पत्र महत्त्वपूर्ण असल्याचे दिसून येते.

पेशव्यांबरोबर त्यांनी माळवा, दिल्ली, राक्षसभुवन, उदगीर, खर्डा, पानिपत या मोहिमांमध्ये आपले कर्तृत्व सिध्द केलेले दिसून येते. या मोहिमांमध्ये सरदार पाटणकरांनी केलेल्या पराक्रमामुळे मराठयांना विजयश्री मिळून आली होती. सरदार पाटणकर यांनी उत्तम प्रशासकीय कौशल्याने पाटण महालाचा कारभार सुरळित चालवलेला दिसून येतो. पायदळ, घोडदळ, आरमार या लष्कराच्या तिन्ही विभागामध्ये सरदार पाटणकर घराण्यातील व्यक्तींनी कार्यकुशलता दाखविल्यामुळे अधिकारपदावर पोहचलेले दिसून येताता. घाटमाथ्याबरोबरच त्यांनी कोकण किनारपट्टीचे रक्षण केलेले दिसून येते. सरदार पाटणकरांचा पराक्रम, सजगता, अचूक निर्णयक्षमता यांचा पेशव्यांनी सन्मान केलेला दिसून येतो.

१८व्या शतकाच्या उत्तरार्धात सरदार नारायणराव पाटणकर हे कोल्हापूरच्या छत्रपतींच्या दरबारात सरलष्करपदावर कार्यरत असल्याचे आपणांस पहावयास मिळते. या काळात सरदार पाटणकरांचे कोल्हापूरच्या छत्रपती घराण्याशी जवळीक असलेले तत्कालिन पत्रव्यवहारावरून

दिसून येते. नागोजीराव पाटणकर, राजसबाई पाटणकर यांना कोल्हापूरचे छत्रपती संभाजी महाराज व जिजाबाईसाहेब यांनी लिहिलेली पत्रे आढळून येतात. या पत्रांचा विषय प्रामुख्याने सोयरिकीसंबंधी व वतनासंबंधी होता. इ.स. १८२२ मधील ग्रॅट डफ यांनी सरदार नागोजीराव पाटणकरांना पाठविलेले पत्र महत्त्वाचे असून या पत्रामध्ये मुरारी रामोशीच्या बंडाळयाविषयीचा मजकूर आपणांस पहावयास मिळतो. तसेच त्याला पकडण्यासाठी केलेल्या उपाययोजनेचा एक भाग म्हणून मुरारीस पकडून देण्याचे आवाहन केलेले होते.

ब्रिटीश कालखंडात या घराण्यातील पुरूषांच्या कर्तृत्वास फारच कमी वाव मिळालेला दिसून येतो. त्यामुळे सरदार पाटणकर घराणे पाटण महाल व इतर जहागिरींमध्ये वास्तव्यास राहून तेथील व्यवस्था पहाताना आपणांस दिसून येतात. याचदरम्यान सातारा आणि कोल्हापूरच्या छत्रपतींनी पाटण महालाला भेट दिल्याचे दिसून येते. सरदार पाटणकरांकडून दोन्ही छत्रपतींचा उचित सन्मान केलेला आपणांस पहावयास मिळतो. सातारचे छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी इ.स. १८२७मध्ये आज्ञापत्राद्वारे पाटणच्या बंडवाल्यांचा बंदोबस्त करण्यास सांगितले होते. तसेच दुसऱ्या आज्ञापत्राद्वारे बंडवाल्यांचा बंदोबस्त केल्याबद्दल सरदार पाटणकरांचे कौतुक ही केलेले दिसून येते. सरदार पाटणकर घराण्यांतील व्यंकटराव पाटणकर हे सावंतवाडी संस्थानचे खासगी कारभारी होते. त्यांनी आपल्या सेवाकालादरम्यान सरकारला चांगले सहकार्य देऊन त्यांची प्रशंसा मिळविलेली आपणांस सावंतवाडी मेमोयरमध्ये दिसून येते.

ब्रिटीश आमदनीत जाज्ज्वल देशभक्ती व मातृभूमीच्या प्रेमाने भारलेल्या महाराष्ट्रातील असंख्य तरूणांचे व निधडया छातीच्या सशस्त्र क्रांतिकारकांचे पाटण हे स्फूर्तिस्थान होते. इंग्रजांविरोधी गुप्त सल्लामसलतीची, त्यांच्याविरूध्द कटकारस्थान करण्याची, प्रसंगी लपण्याची व गावठी हातबॉम्ब करण्याची ती महत्त्वाची पण दुर्लक्षित अशी ठिकाणे होती.

सरदार पाटणकर घराण्यांतील मणदुरे शाखेतील बापूसाहेब पाटणकर हयांनी ब्रिटिशांविरोधी उठाव केला होता. हे बंड इ.स. १८५७च्या प्रसिध्द बंडाअगोदर केले होते. पाटणवरून हेळवाक घाटातून घोडयावरून महसुली लुट घेऊन जाणाऱ्या ब्रिटीश अधिकाऱ्याला बापूसाहेब पाटणकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी जेरबंद करून त्याच्याजवळील संपत्ती जप्त केली. ब्रिटीशांविरोधात अनेक कट कारस्थाने केल्यामुळे ब्रिटीशांनी त्यांना त्यांच्या मणदुरे, परगणे पाटण इलाख्यातून पाच वर्षासाठी हद्दपार केले होते. हद्दपारीची शिक्षा भोगून परत आल्यानंतर बरीच वर्षे बापूसाहेब पाटणकर हे भूमिगतच होते व अखेरपर्यंत त्यांनी ब्रिटीश सत्तेविरूध्दचा संघर्ष चालूच ठेवलेला होता.

पाटण जहागिरीतील लोकांच्या गरजा लक्षात घेऊन अनेक उपक्रम सरदार पाटणकरांनी राबविलेले दिसून येतात. प्रत्यक्षात जहागिरींचा उपभोग घेत असताना सर्वांना एकत्रित करून तसेच सोबत घेऊन जहागिरीचा विकास करण्याचा प्रयत्न ब्रिटीश कालखंडामध्ये सरदार पाटणकरांनी केलेला दिसून येतो. ग्रामसुधारणेच्या दृष्टीने सरदार पाटणकरांनी आपल्या जहागिरीतील खेडेगावातून फार मोठे कार्य केलेले दिसून येते. पाटण जहागिरीतील अनेक गावातील रयतेच्या वैयक्तित अडचणी तसेच सार्वजनिक अडचणी सोडविण्यातही त्यांनी पुढाकार घेतला होता. दुष्काळनिवारण करण्यासाठी त्यांनी स्वखर्चाने काही उपाययोजना केल्या होत्या. त्यांनी केलेल्या उपाययोजना आजही आपणांस पाटण मध्ये पहावयास मिळतात. शिक्षणाचे महत्त्व ओळखून त्यांनी पाटण गावांमध्ये शाळेची स्थापना केली होती. तसेच आरोग्यविषयक सेवा उपलब्ध करण्याच्या दृष्टीने सरकारी दवाखान्याची उभारणी केली होती.

पाटण जहागिरीचे व्यवस्थापन उत्कृष्टरीत्या करून तत्कालिन इतर जहागीरदारांपुढे आदर्श निर्माण केला होता. ब्रिटीश आमदानीतील अनेक गोष्टींचा त्यांनी उपयोग करून घेतला होता. ब्रिटीश

धर्तीवर विविध विभाग सुरू करून या जहागिरीच्या उन्नतीसाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले होते. त्यांना लाभलेल्या या जहागिरीच्या व्यवस्थापनासाठी नोकरदार वर्गाची रचना केली होती. यामुळे सरदार पाटणकर आणि रयतेमध्ये संवाद निर्माण होऊन या संवादांच्या माध्यमातून रयतेस होणाऱ्या अडचणी दूर करण्याचा प्रयत्न केला होता. रोख पगार तसेच महसूली कामगार वर्ग यांच्यात समन्वय निर्माण करून पाटण जहागिरीचा कारभार आदर्शवत केला. शेरी, बारनिशी यांचे दप्तर निर्माण करून सर्व कागदपत्रे व्यवस्थितरीत्या जतन केल्याचे आजही दिसून येते.

फॉरेस्ट विभागाचे ब्रिटीश धर्तीवर योग्य नियोजन करून जमिनी तसेच झाडांची योग्य निगा आणि सरंक्षण करण्याची नीती सरदार पाटणकरांनी आखलेली दिसून येते. तसेच गवतांची कुरणे, राखीव जंगले याबाबत कडक धोरणे आखल्यामुळे डोंगरी विभागात असलेला पाटण तालुका पुढील काही वर्षामध्ये नैसर्गिक साधनसामुग्रीने विपुल बनला होता. तसेच सण, उत्सवांच्या माध्यमातून संस्कृतीचे जतन केलेले आपणांस दिसून येते. ब्रिटीश सरकारने जाहीर केलेल्या फर्स्ट क्लास सरदारांमध्ये पाटणकरांचा समावेश करण्यात आला आहे. सरदार पाटणकरांना इ.स. १८६९मध्ये फौजदारींत मॅजिस्ट्रेटचा व मुलकीत कलेक्टरचा व पोलिसांत चीफ पोलिस, असे अधिकार स्वकर्तृत्वाच्या जोरावर प्राप्त केले होते.

सरदार पाटणकर घराण्याला जिथे संधी मिळाली, तिथे त्यांनी आपल्या कार्यकर्तृत्वाच्या जोरावर आपले स्थान बळकट केले होते. राज्यकारभाराच्या सोयीसाठी सरदार पाटणकरांचा शाखाविस्तार झालेला दिसून येतो. कागल, ग्वाल्हेर, तळेगांव दाभाडे, फलटण, सावंतवाडी, सावर्डे, वाळवा, कुठरे येथील घराण्यांशी त्यांनी वैवाहिक संबंध प्रस्थापित केल्याचे दिसून येतात. सरदार पाटणकर घराण्याचा प्राचीन वारसा, परंपरा, त्यांनी जतन केलेली संस्कृती, त्यांचे मराठा राज्यातील स्थान या कारणांमुळे कोल्हापूरच्या छत्रपती

बरोबर अनेक प्रतिष्ठित घराण्यांनी त्यांच्याशी वैवाहिक संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. सरदार पाटणकर घराण्यांचा अभ्यास करता असे दिसून येते की, चांदजीराव, नागोजीराव व जोत्याजीराव ही नावे सारखी आलेली आहेत. हे पराक्रमी महापुरूष या घराण्यात जन्माला आल्याने त्यांच्या कर्तृत्वाची जाण पुढील पिढीला होण्यासाठी त्यांचे नावे अनेकदा आलेली आपणांस पहावयास मिळतात.

सरदार पाटणकर घराण्यांच्या दृष्टीकोनातून महत्त्वाची बाब म्हणजे याच घराण्यातील नागोजीराव ऊर्फ तात्यासाहेब पाटणकर यांना कोल्हापूरच्या छत्रपती बाबासाहेब महाराजांनी दत्तक घेऊन त्यांचे राजाराम महाराज असे नामकरण केले. छत्रपती राजाराम महाराजांच्या काळात कोल्हापूरमध्ये शैक्षणिक चळवळ मोठया प्रमाणात सुरू झाली. स्त्रियांनीही शिक्षण घ्यावे, असा छत्रपती राजाराम महाराजांचा आग्रह होता. शिक्षणासाठी त्यांनी आर्थिक तरतूद करून त्यातून शिष्यवृत्त्या सुरू केलेल्या दिसून येतात. छत्रपतींची राज्यकारभारातील उत्सुकता आणि आवड लक्षात घेऊन ब्रिटीश सरकारकडून त्यांना लवकरच मुखत्यारी देण्याचा विचारही पुढे आला होता. त्यावेळच्या गव्हर्नरनी त्यांना, युरोप प्रवासाहून परत आल्यावर मुखत्यारी निश्चितपणे दिली जाईल, असे आश्वासन देऊन आश्वस्त केले होते.

थोडक्यात, छत्रपती राजाराम महाराजांनी परदेशगमन करण्याचा जो धाडसी निर्णय घेतला, यामध्ये त्यांना असलेली परदेशी राज्यव्यवस्था, राज्यकारभार, उदयोगधंदे, चालीरीति, शिक्षण, संगीत, नृत्य याबद्दल असलेली त्यांची जिज्ञासा दिसून येते. परंतु तेथील वातावरणातील बदलामुळे दिनांक ३० नोव्हेंबर, १८७० मध्ये छत्रपती राजाराम महाराजांचा फ्लॉरेन्स या शहरी वयाच्या २०व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या निधनाने कोल्हापूरला नवी दृष्टी, ओळख देणारा प्रजा वात्सल्य छत्रपती कोल्हापूरने गमावला होता.

शिवकाल, पेशवेकाल, ब्रिटीशकाल या कालखंडातील सरदार पाटणकर घराण्याच्या कागदपत्रांवरून काही निष्कर्ष निघतात, ते म्हणजे,

- प्राचीन राजवंशाचे वारसदार, गौरवशाली इतिहास यांचा वसा आणि वारसा सरदार पाटणकरांनी आपल्या पराक्रमाच्या जोरावर जपलेला दिसून येतो.
- शिवाजी महाराजांच्या स्वराज्यस्थापनेसाठी महाराष्ट्रातील ज्या काही वतनदार देशमुखांनी सहकार्य दिले, त्यापैकी पाटण परगण्यातील पाटणकर देशमुख प्रमुख होते.
- छत्रपती संभाजी महाराजांच्या निघृण हत्येनंतर स्वराज्यात निर्माण झालेल्या अस्थिर परिस्थितीमध्ये कोणताही अभिलाषा न बाळगता सरदार पाटणकर हे छत्रपतींशी व स्वराज्याशी एकनिष्ठ राहिले. कोणत्याही वतनाच्या व सरंजामाच्या आमिषाला, बक्षिसाला बळी न पडता स्वराज्यकार्य करीत राहिले. हे या घराण्याचे नमूद करण्यासारखे वैशिष्टये आहे.
- छत्रपती राजाराम महाराज कर्नाटकात जिंजीला गेल्यावर 'ना राज्य—ना राजा' अशी परिस्थिती स्वराज्यात जेव्हा निर्माण झाली, त्यावेळी ज्या मराठा सरदारांनी स्वराज्यनिष्ठेने जिद्दीने फौजा उभ्या करून मोगली फौजांशी संघर्ष केला, त्यामध्ये सरदार पाटणकर प्रमुख आहेत.
- प्रसंगी सावकारांकडून कर्जे घेऊन त्यांनी सैन्य उभे केले व त्या सैन्याच्या बळावर अनेक मोगल सरदार बुडविले, ही गोष्ट कौतुकास्पद आहे.
- छत्रपतींकडे सरदार पाटणकरांनी वेळोवेळी मागणी करून इनामे, वतने देण्याची मागणी केलेली दिसून येते. तसेच छत्रपतींनी सरदार पाटणकरांची मागणी मान्य केलेली दिसून येते. हे जरी स्वार्थाचे, लोभाचे वाटत असले तरी सैन्य हे पोटावर चालते. सैन्याचा उदरनिर्वाह, जवळ

असलेल्या प्राण्यांना दाणापाणी त्यामुळे सरदार पाटणकरांनी छत्रपतींकडे केलेली मागणी अयोग्य वाटत नाही.

- काही प्रसंगी छत्रपती राजाराम महाराजांकडून सरदार पाटणकरांनी आपणांस हव्या तशा सनदा मिळविल्या. परंतु तत्कालिन परिस्थितीत अशा मागण्या, सनदा मिळविणे हे प्रतिष्ठितपणाचे लक्षण होते.
- शाहू महाराजांची बाजू न्याय हक्काची आहे, याची जाणीव होताच कोणताही किंतुमनात न ठेवता, ते शाहू महाराजांची बाजू घेतात.
- सरदार पाटणकर यांच्या संघटनकौशल्यामुळे पाटण महालातील तरूणांच्या कर्तृत्वाला योग्य ती संधी प्राप्त होऊन तरूणाईचा उपयोग स्वराज्यवाढीसाठी झालेला दिसून येतो.
- पेशव्यांबरोबर त्यांनी माळवा, दिल्ली, राक्षसभुवन, उदगीर, खर्डा, पानिपत या मोहिमांमध्ये आपले कर्तृत्व सिध्द केलेले दिसून येते. या मोहिमांमध्ये सरदार पाटणकरांनी केलेल्या पराक्रमामुळे मराठयांना विजयश्री मिळून आली होती.
- सरदार पाटणकर यांनी उत्तम प्रशासकीय कौशल्याने पाटण महालाचा कारभार सुरळित चालवलेला दिसून येतो.
- पेशवाईत पुण्यात मुळेकाठी फौजबंद पाटणकर सरदारांचे लष्कर उतरण्याची खास जागा होती.
- पायदळ, घोडदळ, आरमार या लष्कराच्या तिन्ही विभागामध्ये सरदार पाटणकर घराण्यातील व्यक्तींनी कार्यकुशलता दाखविल्यामुळे अधिकारपदावर पोहचलेले दिसून येताता.
- घाटमाथ्याबरोबरच त्यांनी कोकण किनारपट्टीचे रक्षण केलेले दिसून येते.
- सरदार पाटणकरांचा पराक्रम, सजगता, अचूक निर्णयक्षमता यांचा पेशव्यांनी आणि ब्रिटीशांनी सन्मान केलेला दिसून येतो.

- महाराष्ट्रातील सरदार पाटणकर घराण्यांच्या दृष्टीने सन्मानाची बाब म्हणजे इ.स. १८२४ ला सातारचे छत्रपती प्रतापसिंह महाराज आणि इ.स. १८२६ला कोल्हापूरचे छत्रपती बुवासाहेब महाराज यांनी पाटण परगण्याला भेट दिलेली दिसून येते.
- ब्रिटीश सरकारने जाहीर केलेल्या फर्स्ट क्लास सरदारांमध्ये पाटणकरांचा समावेश करण्यात आला आहे.
- सरदार पाटणकरांना इ.स. १८६९मध्ये फौजदारींत मॅजिस्ट्रेटचा व मुलकीत कलेक्टरचा व पोलिसांत चीफ पोलिस, असे अधिकार स्वकर्तृत्वाच्या जोरावर प्राप्त केले होते.
- छत्रपती शिवाजी महाराजांप्रमाणे जुन्या रूढी परंपरांना फाटा देऊन कोल्हापूरचे छत्रपती राजाराम महाराज यांनी परदेशवारी करण्यास गेले होते.
- छत्रपती राजाराम महाराज यांच्या द्रष्टेपणामुळे कोल्हापूरात शैक्षणिक चळवळ, स्त्री शिक्षणांस सुरूवात केलेली दिसून येते.
- शिक्षणाच्या प्रसारासाठी तसेच विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्यासाठी छत्रपती राजाराम महाराजांनी विविध शिष्यवृत्त्या सुरू केलेल्या दिसून येतात.
- स्त्री शिक्षणामध्ये रूची दाखवून राजघराण्यांतील स्त्रीयांना शिक्षणासाठी प्रवृत्त केले होते.
- सरदार पाटणकर घराण्यांचा अभ्यास करता असे दिसून येते की, चांदजीराव, नागोजीराव व जोत्याजीराव ही नावे सारखी आलेली आहेत. हे पराक्रमी महापुरूष या घराण्यात जन्माला आल्याने त्यांच्या कर्तृत्वाची जाण पुढील पिढीला होण्यासाठी त्यांचे नावे अनेकदा आलेली आपणांस पहावयास मिळतात.
- सरदार पाटणकर घराण्याचा प्राचीन वारसा, परंपरा, त्यांनी जतन केलेली संस्कृती, त्यांचे मराठा राज्यातील स्थान या कारणांमुळे अनेक प्रतिष्ठित

घराण्यांनी त्यांच्याशी वैवाहिक संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.

- सरदार पाटणकरांनी उत्सवांच्या निमित्ताने संस्कृती रक्षणाचे काम केलेले दिसून येते.
- सरदार पाटणकरांनी आपल्या द्रष्टेपणानी पाटण महालातील लोकांचे जीवनमान उंचावण्याचे प्रयत्न केलेले दिसून येतात.

थोडक्यात, मराठी सत्तेच्या स्थापनेपासून ते अस्तापर्यंत सरदार पाटणकर घराण्यांनी मराठी सत्तेची सेवा केलेली दिसून येते. ब्रिटीश आमदनीत या घराण्याने मिळालेल्या इनामे, वतने, जहागिरी यामध्ये लक्ष देऊन त्यामध्ये सुधारणा केलेल्या दिसून येतात. त्यामुळे मध्ययुगीन कालखंडातील मराठी सत्तेचा अभ्यास करता सरदार पाटणकर घराण्यांचे योगदान हे महत्त्वपूर्ण होते, असे दिसून येते. आजही पाटण येथे सरदार पाटणकर घराणे आपल्या ऐतिहासिक परंपरेचा वारसा आणि वसा चालविताना दिसून येतात. मात्र तरीही इतिहासाच्या मुख्य प्रवाहापासून यांचे कार्य बाजूला पडलेले दिसते. याची चिकित्सा करण्याच्या दृष्टीने हे संशोधन महत्त्वाचे आहे.